वर्ष- ११ | अंक- २४ | मुंबई, मंगळवार,२९ एप्रिल ते ५ मे २०२५ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

● संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

PG 2 धार्मिक दहशतवादाचा सर्वात क्रूर चेहरा

3 → 'धर्म विचारून गोळ्या झाडल्या' हा फेक नॅरेटिव्ह कसा?

हे कायद्याचे राज्य आहे की बळाचे? ← 4

# भारताने पाकिस्तानचा गळाच कापायला पाहिजे, अमेरिकेच्या माजी अधिकाऱ्याचे ठाम मत



**नवी दिल्ली :** पहलगाममधील भीषण दहशतवादी हल्ल्यानंतर आंतरराष्ट्रीय स्तरावरून पाकिस्तानवर जोरदार टीका केली जात आहे. पहलगामच्या घटनेपूर्वी, काश्मीर ही पाकिस्तानच्या गळ्याची नस आहे, असे सांगतानाच पाकिस्तानचे सैन्यप्रमुख जनरल असीम मुनीर यांनी, मोहम्मद अली जिना यांच्या द्विराष्ट्र संकल्पनेवरही भर दिला होता. यावरून 'अमेरिकन एंटरप्राइझ इन्स्टिट्यूट' या आघाडीच्या अमेरिकन थिंक टँकचे वरिष्ठ सदस्य आणि पेंटागॉनचे माजी अधिकारी मायकेल रुबिन यांनी असीम मुनीर आणि पाकिस्तानवर जोरदार हल्लाबोल केला आहे. असीम मुनीर यांचे हे वक्तव्य म्हणजे, निश्चितच दहशतवादाला हिरवा कंदील देण्यासारखे आहे. 'काश्मीर ही पाकिस्तानच्या कंठाची नस आहे,' असे असीम मुनीर म्हणत असतील तर, आता भारताने पाकिस्तानचा गळाच कापायला पाहिजे. याबद्दल कोणताही संशय किंवा शंका नाही. आता कोणताही शॉर्टकट नाही, असे मायकेल रुबिन यांनी म्हटले आहे.

मायकेल रुबिन यांनी असीम मुनीर यांची तुलना अल-कायदाचा प्रमुख ओसामा बिन लादेनशी केली आहे. फरक एवढाच आहे की, मुनीर एका महालात राहतो तर, बिन लादेन एका गुहेत लपला होता. अमेरिकेने पाकिस्तानला दहशतवादाला खतपाणी घालणारा देश म्हणून घोषित करावे आणि असीम मुनीरला दहशतवादी घोषित करावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

ज्या वेळी पहलगामचा दहशतावादी हल्ला झाला तेव्हा अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हान्स भारतात होते. अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांच्या भारत भेटीदरम्यान झालेल्या दहशतवादी हल्ल्याप्रमाणेच यावेळीही असाच हल्ला करण्यात आला. जेडी व्हान्स यांच्या भारतभेटीवरून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न पाकिस्तानचा आहे. राजकीयदृष्ट्या हल्ल्याची वेळ निश्चित केली होती. हे धक्कादायक आहे; पण यातूनच हेच दिसते की, तुम्ही डुकराला कितीही लाली- लिपस्टिक लावा, पण ते डुक्करच राहाते. आम्ही दहशतवादाचा पुरस्कार करत नाही, असे कितीही दाखवण्याचा पाकिस्तानने प्रयत्न केला तरी, तो दहशतवादाला खतपाणी घालतच राहील, असेही त्यांनी सुनावले आहे.

मायकेल रुबिन यांनी, हमासने 7 ऑक्टोबर रोजी इस्त्रायलवर केलेल्या हल्ल्याची आणि पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याची तुलना केली आहे. दोन्ही हल्ल्यांमध्ये शांतताप्रिय नागरिकांना लक्ष्य करण्यात आले. इस्त्रायलमध्ये उदारमतवादी ज्यू तर, भारतात मध्यमवर्गीय हिंदू होते. रिसॉर्ट्समध्ये सुट्टीचा आनंद घेणाऱ्या मध्यमवर्गीय हिंदू दहशतवादी हल्ल्याचे बळी ठरले. यावरून हे स्पष्ट होते की, पाकिस्तानी आता हीच रणनीती अवलंबत आहे. हमासप्रमाणेच पाकिस्तानच्या दृष्टीने हे कृत्य यशस्वी ठरले असावे. इस्त्रायलने हमाससोबत जे केले, तेच पाकिस्तान आणि पाकिस्तानच्या आयएसआयसोबत भारताने केले पाहिजे. आयएसआयच्या नेतृत्वाला संपवण्याची, त्यांना दहशतवादी गट म्हणून घोषित करण्याची वेळ आली आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारताचे मित्र असलेल्या प्रत्येक देशाने अशी मागणी केली पाहिजे, असे मत त्यांनी मांडले.

पाकिस्तानमध्ये लष्कर-ए-तैयबासह अनेक दहशतवादी संघटना आहेत, हे आम्हाला माहीत आहे. दुर्दैवाने, पाकिस्तानी राजनैतिक अधिकारी पाश्चात्य देशांना मूर्ख बनवत आहेत. त्यामुळे दहशतवादविरोधी कारवाई कमी झाली, अशी टिप्पणी त्यांनी केली.

## पाकिस्तानच्या मदतीला पहिला देश मैदानात, दारुगोळ्याने भरलेली विमानं अन फायटर जेट्स मदतीला धाडली

**नवी दिल्ली :** : काश्मिरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्ष टोकाला पोहोचला आहे. या दोन्ही देशांमध्ये कोणत्याही क्षणी युद्ध होण्याची शक्यता आहे. संरक्षण मंत्रालयाने भारतीय लष्कराच्या तिन्ही दलांना कोणत्याही परिस्थितीसाठी तयार राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे भारत कोणत्याही क्षणी सर्जिकल स्ट्राईक किंवा एअर स्ट्राईक करेल, अशी भीती पाकिस्तानला आहे. तरीही पाकिस्तान भारताशी युद्ध करण्याच्या वल्गना करत आहे. परंतु, देशाची अर्थव्यवस्था रसातळाला गेल्यामुळे पाकिस्तानमध्ये सध्या इंधन आणि युद्धसामुग्रीची चणचण आहे. त्यामुळे पाकिस्तानने अन्य देशांकडे मदतीची मागणी केली होती. या मदतीच्या हाकेला प्रतिसाद देत तुर्कस्तानने पाकिस्तानला दारुगोळा पाठवला आहे.




सूत्रांच्या माहितीनुसार, तुर्कस्तानची ए 130 विमाने दारुगोळा घेऊन पाकिस्तानात पोहोचली आहेत. या विमानांमध्ये दारुगोळ्याचा खूप मोठा साठा असल्याचे सांगितले जाते. तसेच तुर्कस्तान पाकिस्तानला काही लढाऊ विमानं देणार असल्याचीही माहिती आहे. कालच चीनच्या परराष्ट्रमंत्र्यांनी पाकिस्तानच्या पाठीशी असल्याचे संकेत दिले होते. त्यामुळे भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्ध झालं तर तुर्कस्तान आणि चीन हे दोन देश सर्वप्रथम पाकिस्तानला लष्करी आणि आर्थिक कुमक पुरवतील, असा अंदाज आहे. तुर्कस्तानने यापूर्वीही अनेकदा संयुक्त राष्ट्रसंघात काश्मीरचा मुद्दा उपस्थित केला आहे. तर गेल्या काही वर्षांमध्ये चीन आणि पाकिस्तान यांच्यात लष्करी, आर्थिक आणि व्यापारी हितसंबंध तयार झाले आहेत.

दरम्यान, पाकिस्तानची आर्थिक आणि सामरिक कोंडी करण्यासाठी दिल्लीत महत्त्वाच्या बैठकांचे सत्र सुरु आहे. सोमवारी दिल्लीत पंतप्रधानांचे निवासस्थान असलेल्या 7 लोककल्याण मार्ग येते नरेंद्र मोदी आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची महत्त्वाची बैठक पार पडत आहे. या बैठकीत काही महत्त्वाचा निर्णय होणार का, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

### अझरबैजानचा पाकिस्तानला झटका, भारताशी मैत्री

एकीकडे तुर्कस्तानने पाकला मदत केली असली तरी पाकिस्तानच्या मित्र देशांपैकी एक असलेल्या अझरबैजान या देशाने भारतासमोर मैत्रीचा हात समोर केला आहे. अझरबैजानने अहमदाबादला थेट विमानसेवा सुरु केली आहे. अझरबैजानची राजधानी असलेल्या बाकू येथून आता अहमदाबादला थेट विमान जाईल. 4 जुलैपासून ही विमानसेवा सुरु होईल. आठवड्यातून चार वेळा बाकुहून अहमदाबादला विमान जाईल. हा पाकिस्तानसाठी खूप मोठा झटका मानला जात आहे.

## मी नेव्ही ऑफिसरच्या विधवेला काय उत्तर देऊ; जम्मू काश्मीरच्या विधानसभेत मुख्यमंत्री भावूक, ओमर अब्दुल्लांनी बाकही वाजवू दिले नाही

**श्रीनगरः** जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात 26 निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला. या हल्ल्यात अनेकांनी आपले स्वकीय गमावले असून नव्याने लग्न झालेल्या महिलांनी आपल्या डोळ्यादेखत पतीवर गोळ्या झाडल्याचं पाहिलं. या हल्ल्यानंतर देशभरात तीव्र संताप व्यक्त होत असून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या हल्ल्यातील दहशतवाद्यांना सोडणार नाही, त्यांना कठोरात कठोर शिक्षा दिली जाईल, असे म्हटले आहे. त्यातच, जम्मू काश्मीरमध्ये या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आज विशेष अधिवेशन बोलवण्यात आले होते. या अधिवेशनात बोलताना मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी काळजाला हात घालणारं भाषण केलं. केवळ हल्ल्याच्या घटनेचा तीव्र निषेध करण्यासाठी आणि मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप 26 नागरिकांच्या कुटुंबीयांप्रती सहवेदन व्यक्त करण्यासाठी आज आपण इथं आलोय, असेही अब्दुल्ला यांनी म्हटले.

उत्तर ते दक्षिण, पूर्व ते पश्चिमपर्यंत संपूर्ण देश या हल्ल्याने व्यथित झाला आहे. यापूर्वीही अनेक हल्ले झाले आहेत, अमरनाथ यात्रा, काश्मीरी पंडित, सरदार बस्तीया येथेही हल्ले झाले आहेत. मात्र, 21 वर्षानंतर एवढा मोठा हल्ला काश्मीरमध्ये झाल्याचे सांगताना मुख्यमंत्री भावूक झाले. मुख्यमंत्री, पर्यटनमंत्री या नात्याने




आपण पर्यटकांना निमंत्रण दिले होते. आलेल्या पाहुण्यांना, पर्यटकांना सुखरुप येथून पाठविण्याची जबाबदारी माझी होती. पण, नाही पाठवू शकलो. माफी मागायला माझ्याकडे शब्द नाहीत. काय बोलू त्यांना, त्या लहान मुलांना, ज्यांनी आपल्या वडिलांना रक्ताच्या थारोळ्यात पाहिलं. त्या नेव्ही ऑफिसरच्या विधवा पत्नीला काय बोलू, जिचं काही दिवसांपूर्वीच लग्न झालं होतं, असे भावनिक उद्गार ओमर अब्दुल्लांनी सभागृहात काढले. यावेळी, उपस्थित सदस्यांना बाकही त्यांनी वाजवू दिले नाहीत, आज नको.. असे म्हणत बाक वाजवणाऱ्यांना त्यांनी थाबवलं. त्यांच्या या कृत्याने सभागृह स्तब्ध झालं होतं.

### या हल्ल्याने आतून खचलोय


मला काही लोकांनी विचारलं की आमची काय चूक होती? काही दिवसांपूर्वीच आम्ही इथं फिरायला आलो होतो. पहिल्यांदाच आम्ही काश्मीरला सुट्टी घालवायला आलो होतो. पण, आता आयुष्यभर ही सुट्टी आम्हाला दुःखद आठवण देत राहणार आहे. या हल्ल्याने आपलं आतून खच्चीकरण झालंय, अशा शब्दात ओमर अब्दुल्ला यांनी विधानसभेत भावनांना वाट मोकळी करुन दिली.

### तर माझीच मला लाज वाटले

केंद्र सरकारकडे काश्मीरला विशेष राज्य दर्जा देण्याची मागणी करण्याची ही वेळ नाही. यासाठी निश्चितच आपण सातत्याने आवाज उठवला आहे. पुढेही आवाज उठवू, विशेष राज्याची मागणी करू. पण, याप्रसंगी मी ती मागणी करणार नाही. माझं राजकारण एवढं खालच्या स्तराचं नाही. 26 निष्पाप लोकांचा जीव गेलाय, आता आम्हाला विशेष राज्याचा दर्जा द्या, अशी मागणी मी आता केली तर माझ्यावर मला लाज वाटली पाहिजे, असेही मुख्यमंत्री अब्दुल्ला यांनी म्हटलं.

## पहलगाम हल्ल्यानंतर मुंबई अलर्टवर, सीएसएमटी स्थानकात गस्त वाढवली

**मुंबई :** पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरातील सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. 22 एप्रिल रोजी पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या हल्ल्यात 26 नागरिकांचा मृत्यू झाला. त्यातील 6 जण हे महाराष्ट्रातील आहेत. या हल्ल्यानंतर देशभरात संतापाची लाट उसळली. या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण देशभरातील यंत्रणा हाय अलर्टवर असून मुंबईला देखील हाय अलर्ट देण्यात आला आहे. मुंबईच्या रेल्वे स्थानकांवरील सुरक्षा वाढवण्यात आली आहे. दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल्स रेल्वे स्थानकावर रविवारी रेल्वे पोलिसांकडून रूट मार्च करण्यात



आला. सीएसएमटी हे मुंबईतील अत्यंत वर्दळीचे रेल्वे स्थानक आहे. या स्थानकावरून दररोज लाखो प्रवासी ये- जा करतात. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने खबरदारीचा उपाय म्हणून पोलिसांनी बंदोबस्त वाढवला आहे. 26/11 च्या दहशतवादी हल्ल्यात देखील सीएसएमटीला लक्ष्य करण्यात आले होते. मुंबई रेल्वे पोलीस दल आणि गृह रक्षक पोलिसांसोबत एमएसएफ पोलिसांकडून डॉग स्क्वॉड, संपूर्ण टीम सोबत रेल्वे स्थानकावर मॉक ड्रिल सुरू आहे. भारताने पाकिस्तानवर निर्बंध घातल्यानंतर पाकिस्तानकडूनही भारताला सातत्याने धमक्या दिल्या जात आहेत. पाकिस्तानी मंत्री देखील प्रक्षोभक वक्तव्ये करत आहेत. या पार्श्वभूमीवर मुंबईत पोलीस अलर्ट मोडवर आले आहेत. मुंबईने याआधी देखील दहशतवादी हल्ल्यांना तोंड दिले आहे. त्यामुळे, आताही काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी रेल्वे स्थानकांवर रेल्वे पोलिसांसह गृह रक्षक पोलिसांनी रूट मार्च काढला आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर देशभर संतापाची लाट उसळली असून खबरदारीचा उपाय म्हणून मुंबईत अलर्ट जारी करण्यात आला आहे. मुंबईच्या सीएसएमटी रेल्वे स्थानकावर वरिष्ठ विभागीय सुरक्षा आयुक्त आणि आरपीएफ यांच्याकडून संयुक्त पाहणे केले जाणार आहे. आरपीएफ एमएसएफ जीआरपी तसेच डॉग स्क्वॉड कडून सीएसएमटी स्थानकावर गस्त घातली जात आहे. यामुळे सध्या संपूर्ण रेल्वे स्थानकावर कडेकोट बंदोबस्त आहे.

## ५० हजारांची लाच घेताना पोलीस उपनिरीक्षकाला अटक

**भाईंदर :** मिरा- भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालयातील नयानगर पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक रामनाथ ठमाजी तांदळकर (५६ ) यांनी आरोपीला जामीन मिळवून देण्यासाठी लाचेची मागणी केली होती.याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी शुक्रवारी रात्री रामनाथ तांदळकर यांना ५० हजाराची लाच घेताना रंगेहाथ पकडले आहे. तक्रारदाराच्या भावा विरुद्ध नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या दाखल गुन्ह्यात आरोपीला १९ एप्रिल २०२५ रोजी अटक केली आहे. तक्रारदार यांच्याकडे लोकसेवक रामनाथ तांदळकर पोलीस उपनिरीक्षक यांनी आरोपीची जामिनावर सुटका करण्यासाठी व चांगला तपास अधिकारी न्यायालयात देण्यासाठी ७० हजार रुपये लाचेची मागणी केली होती. तक्रारदारांनी २३ एप्रिल रोजी याबाबतची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांच्याकडे केली होती. त्या तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक पोलीस उपनिरीक्षक तांदळकर यांनी तक्रारदार यांच्याकडे तडजोडीअंती ५० हजार रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार शुक्रवारी रात्री करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान तांदळकर यांनी तक्रारदार यांच्याकडून मागणी केलेल्या लाचेची रक्कम पंच साक्षीदार यांच्या समक्ष ५० हजार रुपये तक्रारदार यांच्याकडून घेतली आहे. लोकसेवक तांदळकर यांना लाच घेताना रंगेहाथ पकडून ताब्यात घेण्यात आले आहे. तांदळकर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# काश्मिरी पंडितांचे काय झाले?



जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे विविध राज्यांमधून गेलेल्या २६ पर्यटकांवर दहशतवाद्यांनी गोळीबार करून त्यांना ठार मारले. त्यांना ठार करण्यापूर्वी तुम्ही कोणत्या धमार्चे आहात हे विचारले, जे हिंदू धमार्चे होते त्यांना गोळ्या घालण्यात आल्या. विविध राज्यांमधून गेलेल्या पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेला हल्ला हा खरे तर भारताच्या विविधतेवर केलेला हल्ला आहे. दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या हल्ल्यांमुळे देशभरातून संतापाची लाट उसळली. या दहशतवाद्यांना कोण पाठिंबा देते, हे कुठून येतात हे आता मागील अनुभवातून सगळ्यांना माहीत झालेले आहे. त्यामुळे पाकिस्तानला या हल्ल्याबद्दल चांगला धडा शिकवावा, अशी भावना देशातून व्यक्त झाली. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तात्काळ उच्चस्तरीय बैठक घेतली आणि पाकिस्तानवर पाच निर्बंध घातले. त्यात एक आहे, भारतात असलेल्या पाकिस्तानी नागरिकांनी तात्काळ देश सोडावा. त्यानंतर भारतात जे पाकिस्तानी नागरिक आहेत, त्यांची शोधाशोध सुरू झाली. खरे तर भारतात पाकिस्तानी नागरिक कशाला येतील, असेच इथल्या सर्वसामान्य नागरिकाला वाटते. पण आता विविध राज्यांमधील पाकिस्तानी नागरिकांची संख्या पाहता आश्चर्य वाटल्यावाचून राहत नाही.

ज्यावेळी केंद्र सरकारने नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए) कायदा आणला तेव्हा शाहीन बाग आंदोलन का करण्यात आले असेल, हे आता लक्षात येऊ शकेल. कारण त्यामुळे जे पाकिस्तानातील मुसलमान इथे अनधिकृतपणे राहत आहेत, त्यांना बाहेर काढण्यात येणार होते. त्यांना आता पहलगामच्या हल्ल्यानंतर बाहेर काढण्यात येत आहे. त्यापूर्वी अनेक पाकिस्तानी रुग्णांवर भारतात मोफत किंवा माफक दरात गुंतागुंतीच्या शस्त्रकिया करण्यात आल्या, पण त्यामुळे पाकिस्तानी राज्यकर्त्यांचे हृदय परिवर्तन झाले नाही हा भाग वेगळा. पण आता जेव्हा पाकिस्तानी नागरिकांना भारतातून बाहेर काढण्यात येत आहे, तेव्हा काही लोकांकडून मानवतावादी दृष्टिकोनातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. यात नागरिकांचा काय दोष, ते काही अतिरेकी नाहीत, असा व्युक्तिवाद करण्यात येत आहे. इतकेच नव्हे तर जे काश्मीरमध्ये पर्यटनांसाठी गेले होते त्यांनीही स्थानिक मुसलमांनाबद्दल आपली चांगली मते व्यक्त केली आहेत. काश्मीरमधील लोक चांगले आहेत, त्यांनी आमची चांगली काळजी घेतली, असे ते सांगत आहे. ही आनंदाची बाब आहे. अर्थात, या पर्यटकांकडून त्यांना पैसे मिळत असतात.

काश्मीरमध्ये राहणारे सगळेच मुसलमान काही अतिरेकी नाहीत, हे बरोबर पण याच काश्मीरमध्ये राहणारे जे काश्मिरी पंडित होते, त्यांचे काय झाले, याचा विचार करताना फारसे कुणी दिसत नाही. काश्मीरमधील हिंदू पंडित जे भारताचे नागरिक असूनही त्यांच्यावर जीवघेणे हल्ले का झाले, ते घरांपासून पोरके का झाले? गेली ३० वर्षे ते भटकत आहेत. गेल्या तीस वर्षांत काश्मीरमध्ये किंवा केंद्रात सत्तेत आलेल्या सरकारांनी त्यांना मूळ घरांमध्ये पुन्हा स्थापित केले नाही. काश्मिरी पंडितांची मूळ घरे आहेत, तो काश्मीर काही भारतीय सीमेच्या बाहेर नाही, भारताकडे इतके मोठे सैन्य दल आणि शस्त्रास्त्र संपन्नता असतानाही कुठल्याच सरकारला पंडितांना आपल्या घरी परत जाण्याचा मार्ग सुकर का करता आला नाही, याचा विचार करायला आज कुणी तयार नाही. काश्मिरी पंडित दिल्लीतरी जंतर मंतर येथे सातत्याने टाहो फोडत असतात, पण केंद्र आणि काश्मीरमधील राज्य सरकार त्यांच्यासाठी काही करत नाही. या काश्मिरी पंडितांना मोदींचे बहुमतातील सरकार केंद्रात आल्यानंतर आपल्याला आपल्या मूळ घरी जाता येईल, निर्भयपणे राहता येईल, असे वाटत होते, पण तेही झालेले नाही. मध्यंतरी काश्मीर फाईल्स नावाचा चित्रपट आला होता, त्यावेळी ठिकठिकाणी विपन्नावस्थेत राहर्णाया काश्मिरी पंडितांची विदारक स्थिती दिसून आली होती. १९९० च्या सुमारात काश्मीरमध्ये पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाने उचल खाल्ल्याने काश्मिरी पंडितांचा कतले आम सुरू झाला. त्यांना त्यांच्या घरांमधून हाकलून देण्यात आले. जेव्हा १९४७ साली भारताची फाळणी झाली तेव्हाही पाकिस्तानातील हिंदूंच्या अशाच कत्तली उडवण्यात आल्या होत्या. त्यांनी आपली घरे सोडून भारत गाठला होता. ही १९४७ ची गोष्ट होती, देश स्वतंत्र झाल्यानंतर जेव्हा काश्मीर भारताचा भाग होता, भारताकडे मोठे लष्कर होते, त्यावेळी १९९० च्या सुमारास याच देशातील नागरिकांना त्यांचीच घरेदारे सोडून जीवानिशी पळावे लागले, याला काय म्हणावे. भारतीय संसदेत वक्फ कायदा मंजूर झाला त्याच्या निषेधार्थ देशात काही ठिकाणी आंदोलने सुरू आहेत. पश्चिम बंगालमध्ये याचा जास्त जोर आहे. पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद आणि परिसरात राहर्णाया हिंदूंवर मुसलमानांनी हल्ले केले, त्यांची घरे सोडून त्यांना पळावे लागले. भारताच्या सीमेत असलेल्या भागात राहर्णाया हिंदूंची जर स्वतंत्र भारतात ही अवस्था होत असेल तर जे पाकिस्तान आणि बांगलादेशमध्ये बिगरमुस्लीम राहतात, त्यांना जीव मुठीत घेऊन कसे जागावे लागत असेल याची कल्पना केलेली बरी. पाकिस्तानमधून तर आता बहुतेक हिंदू साफ झालेले आहेत. बांगलादेशमध्ये त्यांच्यावर होत असलेले हल्ले भारत हतबलपणे पाहत आहे, आणि भारतामध्ये दीड कोटी बांगलादेशी पोट भरायला राहत आहेत. याला काय म्हणावे?

# धार्मिक दहशतवादाचा सर्वात क्रूर चेहरा

ओळखली जातस्य जम्मू आणि स्वित्झर्लंड' काश्मीरमधील पहलगाममध्ये मंगळवारी एक भयानक, वेदनादायक आणि अमानवी दहशतवादी हल्ला झाला, जो पुन्हा एकदा जिहादी दहशतवादाचा घृणास्पद आणि क्रूर चेहरा दाखवतो. पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी ज्या प्रकारे निष्पाप आणि निःशस्त्र पर्यटकांना ओळखले आणि त्यांच्यावर गोळ्या झाडल्या त्यावरून दिसून येते की, त्यांना केवळ भीती निर्माण करायची नव्हती, तर मोठ्या संख्येने लोकांचे रक्त सांडून जगाचे लक्ष वेधायचे होते. हा आतापर्यंतचा सर्वात घृणास्पद आणि क्रूर हल्ला आणि दहशतवाद आणि सांप्रदायिक द्वेषाचा चेहरा आहे, ज्यामध्ये हिंदू नाव ऐकताच गोळ्या झाडल्या गेल्या. जो पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाच्या मूळ अजेंड्याचा भाग आहे. या घृणास्पद आणि दुःखद घटनेत अमेरिकेचे उपराष्ट्रपती भारतात असताना आणि भारतीय पंतप्रधान सौदी अरेबियात असताना निष्पाप पर्यटकांचा बळी गेला. हल्ल्याची जबाबदारी पाकिस्तानमधील बंदी घातलेल्या दहशतवादी संघटनेने लष्कर-ए-तैयबाशी संबंधित असलेल्या 'द रेझिस्टन्स फ्रंट'ने घेतली आहे. सुरक्षा यंत्रणांचा असा विश्वास आहे की, हल्लेखोर दक्षिण काश्मीरमधील कोकरनागमार्गे किश्तवारमार्गे वैसरन येथे पोहोचले. ही घटना मंगळवारी दुपारी ३ वाजताच्या सुमारास घडली, जेव्हा बैसरन आणि आसपासच्या गवताळ प्रदेशात मोठ्या संख्येने पर्यटक मजा करत होते. काही जण खेचरांवर स्वारीचा आनंद घेत होते, तर काही कुटुंबे पिकनिक साजरी करत होती. त्यानंतर दबा धरून बसलेल्या दहशतवाद्यांनी अंदाधुंद गोळीबार सुरू केला. या घटनेला पाकिस्तान थेट जबाबदार आहे. काही दिवसांपूर्वीच पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांनी हिंदू आणि भारताविरुद्धच्या द्वेषाचे अश्लील प्रदर्शन जिहादीसारखे केले होते हे दुर्लक्षित करता कामा नये. अबू मुसाचे ते भाषण आणि त्यानंतर लगेचच घडलेले पहलगाम हत्याकांड हे दर्शविते की, पीओकेमध्ये बसलेले दहशतवादी नेते केवळ भारतविरोधी विषारी प्रचार करत नाहीत तर काश्मीर खोऱ्यातील शांतता, विकास आणि सौहार्द विघडवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. ते येणाऱ्या काळात पुन्हा खोऱ्यात बिघाड करण्याच्या योजनेवरही काम करत आहेत. या भयानक दहशतवादी हल्ल्यानंतर, खोऱ्यातील पर्यटनाशी संबंधित व्यवसाय ठप्प होणे जवळजवळ निश्चित आहे. शेवटी, अशा भयानक घटनेनंतर कोणता पर्यटक

काश्मीरमध्ये येईल ? शांतता आणि समृद्धीच्या दीर्घ काळानंतर, पुन्हा एकदा काश्मीरवर अशांतता आणि दहशतीचे ढग दाटून आले आहेत. पृथ्वीवरील स्वर्गाच्या आभाळाला ग्रहण लागलेले ढग दूर होऊ लागले होते, तेव्हा पहलगाममधील दहशतवाद्यांनी पुन्हा एकदा अशी घटना घडवून आणली आहे, ज्यामुळे संपूर्ण देशात संतापाची लाट निर्माण झाली आहे. कलम ३७० हटवल्यानंतर काश्मीरमध्ये एवढा मोठा दहशतवादी हल्ला होण्याची ही पहिलीच वेळ आहे, दहशतवाद्यांना आणि त्यांच्या समर्थकांना चोख प्रत्युत्तर देणे केवळ आवश्यकच नाही तर अत्यावश्यकही आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याची गंभीरता पाहता गृहमंत्री अमित शाह घाईघाईने श्रीनगरला रवाना झाले असताना, सौदी अरेबियाला गेलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांचा दौरा अर्ध्यावरच सोडून दिल्लीला आले यावरून स्पष्ट होते. दिल्लीत पोहोचताच त्यांनी विमानतळावरच एक बैठक घेतली, ज्यामध्ये अजित डोभाल यांच्याशी गंभीर सल्लामसलत केल्यानंतर त्यांनी या दहशतवादी



घटनेविरुद्ध कारवाई करण्यास सुरुवात केली. मोदी आणि शाहा यांच्या कृतीमुळे यावेळी काहीतरी निर्णायक घडेल अशी आशा निर्माण झाली आहे. दहशतवादाची भावना पहलगामच्या सुंदर खोऱ्याला रक्ताने रंगविण्यासाठी बाहेर पडली असेल, परंतु यावेळी निष्पाप लोकांचे रक्त वाया जाऊ नये. हा हल्ला पाकिस्तानच्या दहशतीचा परिणाम आहे, तो त्याच्या इशाऱ्यावर करण्यात आला. पाकिस्तान जळत्या बलुचिस्तानवरून जगाचे लक्ष विचलित करू इच्छित आहे आणि काश्मीरमधील परिस्थिती वेगाने सामान्य होत आहे हे त्याला आवडत नाही असे मानण्याची ठोस आणि खात्रीशीर कारणे आहेत. भारताने पाकिस्तानच्या वाईट हे तूंबद्दल अधिक सावधगिरी बाळगायला हवी होती. ते पूर्वीही विश्वसनीय नव्हते आणि आताही नाहीत. आता दहशतवाद्यांना पाठिंबा आणि प्रोत्साहन देणाऱ्या पाकिस्तानला निर्णायक धडा शिकवणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. तहव्वर राणाचे प्रत्यार्पण हा दहशतवादाविरुद्ध भारताचा मोठा विजय बनला आहे, ज्यामुळे पाकिस्तानलाही भीती वाटली आहे. मुंबई आणि देशाच्या इतर भागांमध्ये आणि विशेषतः जम्मू आणि काश्मीरमध्ये दहशतवादी हल्ल्यांच्या संपूर्ण नियोजनामागे पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय आणि त्याच्या भूमीवर कार्यरत असलेल्या दहशतवादी संघटनांचाच हात होता असे नाही तर आर्थिक आणि इतर प्रकारचे पाठबळही होते. पहलगामची अलीकडील घटना असो किंवा वारंवार घडणाऱ्या दहशतवादी घटना असोत, सर्व पुरावे असूनही, आपली भूमिका नाकारत आहे. तथापि, ते दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबाचा प्रमुख हाफिज सईद आणि झाकी-उर-रहमान लखवीसारख्या दहशतवादी नेत्यांनाही संरक्षण देत आहेत. राणाच्या माध्यमातून पाकिस्तानचे संपूर्ण सत्य उघड झाले आहे. पाकिस्तानला जगासमोर उघड होण्याची भीती होती, म्हणूनच त्याने ही पहलगाम घटना घडवून आणली. पण आता त्याने सर्व मयार्दा ओलांडल्या आहेत. आता त्याला एकाच वेळी अनेक आघाड्यांवर दहशतवादाविरुद्ध स्वतःला तयार करावे लागेल, आता भारतीय सुरक्षा यंत्रणांचे खरे मोठे काम येथूनच सुरू करावे लागेल. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा सीमापार दहशतवाद म्हणजेच पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाशी लढण्यात भारताला पाठिंबा देण्याचा आपला निर्धार पुन्हा व्यक्त केला आहे, त्याचप्रमाणे रशियादेखील भारतासोबत आहे. दहशतवादाविरुद्धच्या लढाईत अनेक देशांनी भारताला सर्व प्रकारे पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले आहे. आता पाकिस्तानला त्याची जागा दाखवून देण्याची आणि त्याचे विध्वंसक आणि विनाशकारी हेतू नष्ट करण्याची वेळ आली आहे. तीन दशकांपासून काश्मीर खोरे पाकिस्तान या हल्ल्यांमागील दोषी आणि निष्पापांच्या रक्ताची हळदीघाटी राहिले आहे. परंतु २०१४ पासून, नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर, तेथे शांतता आणि विकासाचे अभूतपूर्व वातावरण निर्माण झाले आहे, हे पाकिस्तानला आवडत नाही. काश्मीरसह संपूर्ण जगातून दहशतवाद संपवण्यासाठी पुढाकार घेऊन मोदींची आणखी एक चमत्कार घडवण्याची तयारीही पाकिस्तानसाठी एक मोठे आव्हान बनली आहे. आता पाकिस्तानमध्ये घुसून त्याला धडा शिकवण्याची वेळ आली आहे. सर्जिकल हल्ला हा एकमेव मजबूत उत्तर असू शकतो. या सततच्या हल्ल्यांनंतरही हिंदू समुदाय शांतता आणि करुणेबद्दल बोलत आहे. पण एक मोठा प्रश्न असा आहे की, हे कधीपर्यंत चालू राहील? भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. भारताची वाढती पावले रोखण्यासाठी पाकिस्तान दहशतवादी संघटना आणि दहशतवादाचा आधार घेत आहे. भारत सरकारच्या धोरणामुळे, मजबूत सुरक्षाव्यवस्था आणि सरकारच्या सतर्कतेमुळे पाकिस्तान, त्याच्या दहशतवादी संघटना आणि दहशतवादी त्यांच्या मनसुब्यांमध्ये यशस्वी होऊ शकत नाहीत. सततच्या अपयशामुळे चिडलेले आणि निराश झालेले दहशतवादी काही नवीन आणि अधिक भयानक दहशतवादी घटना घडवून आणण्यात गुंतले आहेत, आपल्या सुरक्षा संस्थांनी अधिक सतर्क राहण्याची अपेक्षा आहे.

# वसई विरार शहर महानगरपालिका

## जा.क्र. वविशम /प्र.स.सी /जाहि./८३/२०२५ , दिनांक २८/४/२०२५

वसई विरार शहर महानगरपालिका अधिनियम 1949 चे अधिसूचीतील प्रकरण 8 मधील कलम 1 (1) व 1 (2) अन्वये व 469 च्या नुसार जाहिर नोटीस खालिल मालमत्तेच्या हस्तांतरणा संबंधित वसई विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय विरार येथे प्राप्त मालमत्ता प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून 15 दिवसांच्या आत हितसंबंधाच्या हरकतीच्या लेखी पुराव्यास विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालयात लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी, अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी हस्तांतरण करून महानगरपालिका याबाबत नोंद घेतली जाईल.

| अ.क्र. | दिनांक | अनुसुचित दोन / तीन मधील नोटिसीची मालमत्ता क्र. | कर निर्धारण पुस्तकातील क्र. | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे स्वरुप | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्याचे नाव किंवा अभिहस्तांकन कत्यार्चे नाव | खरिददाराचे किंवा अभिहस्तांकन नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 24/02/2025 | CH04/632 | 4 | कातकरीपाडा, चंदनसार | निवासी | कल्पना कमळाकर करगुटकर | शांता सुनिल जाधव |
| 2 | 24/02/2025 | CH03/64/85 | 3 | जिवदानी पार्क 2 रूम नुम/208 गासकोपरी, काटई | निवासी | नरेंद्र शिवराम बाद्रें | सुरेश शिवराम वांद्रे |
| 3 | 24/02/2025 | CH01/130/19 | 1 | साई समर्थ नगर चाळ गासकोपरी | निवासी | सदेश शंकर गुरव | सुबोध सहदेव पैकडे |
| 4 | 27/02/2025 | CHA04/1514/519 | 4 | एच डी आय एल इंडस्ट्रियल पार्क बि. नं. 16 दुकान नूम./110 चंदनसार रोड | वाणिज्य | घनश्याम खेमचंद भागचंदानी | रणछोदाराम एस रबारी |
| 5 | 27/02/2025 | CH03/67/9 | 3 | सई अपार्टमेंट-2 रूम नं. 009 जय अंबे पार्क, गासकोपरी, चंदनसार | निवासी | वैशाली किशोर दळवी | रोहन गणपत सावंत व दिपा रोहन सावंत |
| 6 | 27/02/2025 | KS01/175/3 | 1 | कसराळी | निवासी | श्याम काळ्या पाटील | विकास महादेव पाटील |
| 7 | 27/02/2025 | KS01/175/2 | 1 | कसराळी | निवासी | महादेव काळ्या पाटील व त्रिम्बक काळ्या पाटील व श्याम काळ्या पाटील | विकास मुहादेव पाटील |
| 8 | 27/02/2025 | KS01/175/4 | 1 | कसराळी | निवासी | महादेव काळ्या पाटील | विकास मुहादेव पाटील |
| 9 | 27/02/2025 | CH03/52/34 | 3 | सुशिला अपार्टमेंट रूम नं. /06 नारायण नगर, गासकोपरी | निवासी | नयना सुनिल चोरघे | दशरथ रामचंद्र शेळके व नीता दशरथ शेळके |
| 10 | 27/02/2025 | CH03/52/30 | 3 | सुशिला अपार्टमेंट ए/002 नारायण नगर, गासकोपरी | निवासी | नयना सुनिल चोरघे | दशरथ रामचंद्र शेळके व नीता दशरथ शेळके |
| 11 | 27/02/2025 | CH07/624/1 | 7 | ओम साई कृपा चाळ नं. 1नं. ए/01 बरफपाडा, भाटपाडा | निवासी | वरून झा | सरिता ओमप्रकाश पाल |
| 12 | 27/02/2025 | CH07/732/1 | 7 | श्री हरी बफेश्वर चाळ रूम नं. डॉ/05 अंबेमाता मंदिर रोड, बफेश्वर तलाव समोर, बरफपाडा, भाटपाडा, चंदनसार रोड | निवासी | लक्ष्मी गजानन महाडीक | उषा देवी राम दुलार गुप्ता |
| 13 | 27/02/2025 | CH07/661/11 | 7 | साई कृपा चाळ रूम नं. बी. /02 अष्टविनायक नगर, मुत्तपन मंदिर समोर, भाटपाडा | निवासी | निलम धर्मेंद्र जैसवाल | पुजा धीरज पाण्डे |
| 14 | 27/02/2025 | CH07/732/23 | 7 | श्री हरी बफेश्वर चाळ रूम नं. ए/07 अंबेमाता मंदिर रोड, बफेश्वर तलाव समोर, बरफपाडा, भाटपाडा, चंदनसार रोड | निवासी | वरून झा | गीता देवी राजा प्रसाद यादव |
| 15 | 27/02/2025 | CHO7/732/41 | 7 | श्री हरी बफेश्वर चाळ रूम नं. डी/06 अंबेमाता मंदिर रोड, बफेश्वर तलाव समोर, बरफपाडा, भाटपाडा, चंदनसार रोड | निवासी | दिपक गजानन महाडीक | वन्दना देवी दिलीप कुमार यादव |
| 16 | 27/02/2025 | CH07/531/9 | 7 | ओम साई श्रद्धा चाळ सी/09 बरफपाडा, भाटपाडा, चंदनसार रोड | निवासी | उमेश मन्नू यादव | सत्यपाल श्रीराम यादव व किरण सत्यपाल यादव |
| 17 | 27/02/2025 | SH01/1040/2 | 1 | साई श्रद्धा चाळ रूम नं. 15 वाघोबा मंदिर समोर, राइपाडा, शिरगाव | निवासी | लक्ष्मी कुमार बैठा | कृष्णमोहन रामस्वार्थ साह |
| 18 | 27/02/2025 | CH04/38 | 4 | चंदनसार | निवासी | कमलेश हरिश्चंद्र पाटील | राजेश महेश कटयार |
| 19 | 27/02/2025 | CH01/178/9 | 1 | कुलस्वामिनी अपार्टमेंट रूम नं. डी/201 गासकोपरी, चंदनसार रोड | निवासी | हरेश्वर दत्तात्रेय म्हात्रे | सरोज संतोष शर्मा |
| 20 | 27/02/2025 | CH03/64/111 | 3 | जिवदानी पार्क 2 रूम नुम/317 गासकोपरी, काटई | निवासी | संजय तेरू भोवड | उमेश दत्ताराम भोवड व पूर्वा उमेश भोवड |

सही/-
सहा. आयुक्त
प्रभाग समिती सी चंदनसार
वसई-विरार शहर महानगरपालिका

# संपादकीय

# 'धर्म विचारून गोळ्या झाडल्या' हा फेक नॅरेटिव्ह कसा?



संपादक दिपक मोरेश्वर नाईक




निरपराध पर्यटकांचा बळी गेलेल्या पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर देश एकीकडे हादरलेला असताना, दुसरीकडे काही नेते आणि तथाकथित पुरोगामी मंडळी या हत्याकांडाच्या पार्श्वभूमीवर स्वतःचा राजकीय अजेंडा रेटण्याचा प्रयत्न करत आहेत. हा हल्ला केवळ एक दहशतवादी कृत्य नव्हते तर ते धर्माच्या आधारावर निवडून मारण्याचे अमानवी कृत्य होते, हे एव्हाना स्पष्ट झाले आहे. "दहशतवाद्यांनी धर्म विचारून लोकांना मारले", या बाबतीतही सध्या सोशल मीडियावर क्लेशदायी काथ्याकूट सुरू आहे. अशा परिस्थितीत हिंदू-मुस्लिमांमधील एकोपा टिकून राहणे गरजेचे आहेच. परंतु त्यातून वस्तुस्थिती नाकारूनही कसे चालणार? डोंबिवलीतील ज्या मोने, लेले आणि जोशी कुटुंबाने कर्ते पुरुष गमावले, त्यांनीही पत्रकार परिषदेत, "दहशतवाद्यांनी धर्म विचारून लोकांना लक्ष्य केलं" असेच सांगितले.

घटनास्थळावरील अन्य पर्यटकांनीही याला दुजोरा दिला. असे असताना या घटनेवर शंका घेण्यात काय हशील? या कटू सत्याला "फेक नॅरेटिव्ह" कसे ठरवता येईल? खरे तर अशा घटनेतून जेव्हा एखादी वस्तुस्थिती समोर येते, तेव्हा तिचं मूल्यांकन नीटपणे, सचोटीने आणि निर्भीडपणे होणे गरजेचे आहे. पण त्याऐवजी काही तथाकथित पुरोगामी मंडळी, विरोधी नेते आणि तथाकथित "नैतिक बाळबोध" मंडळी यातूनही हिंदू-मुस्लीम तेढीचे राजकारण शोधत आहेत. येथे फार स्पष्टपणे सांगायला हवे की, समस्त मुस्लीम समाज हा या गुन्ह्याचा आरोपी नाही. पण पाकिस्तानी किंवा इतर इस्लामी अतिरेकी संघटना ज्या धर्माच्या नावावर हिंसाचार करतात, ती धर्मांधता निश्चितपणे प्रश्नाच्या केंद्रस्थानी आहे. ती धर्मांधता हीच या हल्ल्याचे मुख्य कारण आहे. हे सांगायला आपण जर घाबरत असू, तर आपण सत्याला स्वतःच्या भीतीच्या पिंजर्‍यात बंद करत आहोत. "धर्माच्या नावावर हल्ला झाला नाही", "हिंसा कोणत्याही धर्माशी जोडू नका" हे सगळे बोलणे वरवर नीतीवादी वाटत असले, तरी त्यातून खर्‍या गुन्हेगारांचे उदात्तीकरण होते आणि बळी गेलेल्यांच्या वेदनेचा अपमान होतो. सामाजिक ऐक्य राखणे, ही नक्कीच काळाची गरज आहे. मुस्लीम समाज हा आपल्या देशाचा अविभाज्य भाग आहे आणि त्यांच्याशी कोणतीही विखारी भावना बाळगणे ही असंविधानिक आणि अमानुष गोष्ट ठरेल.

पण त्याचवेळी, अतिरेकी हल्ल्यांमध्ये सातत्याने दिसणारा एक विशिष्ट धार्मिक कट्टरतेचा प्रवाह, जो प्रामुख्याने पाकिस्तानातून पोसला जातो तो अधोरेखित करायला मागे-पुढे पाहणे ही बाब खरे तर लोकशाहीसाठीही धोकादायक ठरावी. राजकारणात विरोधी बाकावर बसणार्‍यांचा आणि त्यांच्या संलग्न बुद्धिवादी मंडळींनी उघडपणे चालवलेल्या या अजेंड्यामागे मुस्लीम समाजाचे रक्षण नाही, तर केवळ स्वतःच्या मतबँकेचे आणि प्रतिमेचे राजकारण आहे. यात दुहेरी नुकसान होते. एकीकडे सत्याची हत्या होते आणि दुसरीकडे मुस्लीम समाजाला सतत बचावात्मक अवस्थेत ढकलले जाते. जे गुन्हे केले आहेत, ते ठराविक धर्माच्या कट्टरपंथीयांनी केले आहेत ही गोष्ट स्पष्ट करणे म्हणजे मुस्लीम समाजाला दोष देणे नाही. हे एक दुःखद वास्तव आहे, जे समाजातल्या संपूर्ण मुस्लीम बांधवांनीही स्पष्टपणे ओळखायला हवे. त्यातून सीमारेषेच्या पलीकडच्या धर्मांध प्रवृत्तींना स्पष्टपणे नाकारायला हवे. इतक्या संवेदनशील घटनेतून आपली राजकीय पोळी भाजणार्‍यांना आणि बेताल वक्तव्य करणार्‍यांनाही वेळीच लगाम घालायला हवा. जेव्हा सरकार, प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणा सर्व ताकदीने कामाला लागले आहेत, त्याचवेळी उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी, "अमित शहांनी राजीनामा द्यावा आणि देशावर मेहरबानी करावी" असे विधान करत आपल्या बेजबाबदार राजकारणाची परिसीमा गाठली आहे. हल्ला रोखणे शक्य होते का, याची चौकशी होणे गरजेचेच आहे. परंतु एक गोष्ट स्पष्ट आहे की, हा हल्ला केवळ एका व्यक्तीच्या इच्छेवर किंवा दुर्लक्षामुळे घडलेला नाही. ही एक संगनमताने आखलेली, दहशतवाद्यांची कुटिल योजना होती, ज्यात बाह्य आणि अंतर्गत शक्ती सामील होत्या. यावर संपूर्ण सुरक्षा यंत्रणा काम करते आहे. अशा परिस्थितीत घटनेचे गांभीर्य ओळखून मदतकार्यात सहभागी होण्याऐवजी राऊत आपला "राजकीय प्रोपोगंडा" सेट करत आहेत. दुसरीकडे खासदार नरेश मस्के यांनी केलेले विधान, "जे लोक कधीही विमानात बसले नाहीत त्यांना एकनाथ शिंदेंनी विमानात बसवून आणलं" हेदेखील अत्यंत अहंकारयुक्त आणि सामान्य जनतेचा अपमान करणारे वाटते. या वक्तव्यातून संकेत मिळतो की, राजकारणात माणसाची किंमत त्याच्या आर्थिक परिस्थितीवर किंवा जीवनशैलीवरून मोजली जाते, जे लोकशाहीच्या तत्त्वांना धरून नाही. शिवसेनेचा इतिहास हा सामान्य माणसाच्या आवाजासाठी लढणारा आहे आणि त्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारची वक्तव्ये पक्षाच्या मूळ विचारधारेपासून दूर नेतात. विमानात बसणे, हा कुणाचाही "मूलभूत हक्क" नसला, तरी तो कुणाच्या "कृपेचा प्रसाद" ही नाही. एकनाथ शिंदेंनी लोकांना संधी दिली असेल, ही गोष्ट स्वागतार्ह आहे, पण तिचे श्रेय घेण्याची पद्धत ही विनयशील आणि समंजस असायला हवी. या हल्ल्यात मरण पावलेले पर्यटक केवळ एका राज्याचे, एका धर्माचे किंवा एका गटाचे नव्हते. ते भारतीय होते. आपल्या देशाचे नागरिक. म्हणूनच त्यांच्यावर झालेला हल्ला आपल्यापैकी प्रत्येकावर झालेला आहे. अशा वेळी देशातल्या जबाबदार राजकारणी, लोकप्रतिनिधी आणि राजकीय विश्लेषकांनी अत्यंत संयमाने आणि उत्तरदायित्वाने प्रतिक्रिया द्यायला हव्यात.

# जातपंचायतीला मूठमाती देणारा महाराष्ट्र



विविध सामाजिक चळवळी ही फुले-शाहू-आंबेडकरांच्या महाराष्ट्राची विशेष ओळख आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात केशवपनापासून ते बालविवाहांपर्यंत वेगवेगळ्या अनिष्ट प्रथांविरोधात सुरू झालेला संघर्ष स्वातंत्र्योत्तर काळात देवाच्या नावाने जटा वाढवणं, देवदासी, पशुबळी अशा प्रथांच्या विरोधात सुरू राहिला. या अशा संघषार्चे अलीकडच्या काळातील उदाहरण म्हणजे जातपंचायत मूठमाती अभियान.

खूप पूर्वी मी पाकिस्तानमधील मुक्तारमाईविषयी वाचलं होतं. मुक्तारच्या भावाने तिथल्या तथाकथित उच्चवर्णीय मुलीशी प्रेमसंबंध प्रस्थापित केल्याचा संशय आल्यामुळे उच्चवर्णियांची जातपंचायत बसली. जातपंचायतीने शिक्षा दिली, ती मुक्तारमाईवर जातपंचांनी सामुदायिक बलात्कार करण्याची. ही अमानुष व माणुसकीला काळिमा फासणारी घटना वाचल्यानंतर खूप वेदना झाल्या. परंतु त्यावेळी असे वाटत होते की, हे कुठेतरी लांब घडत आहे. आपल्याकडे असं काही नाही. परंतु हा माझा भ्रम होता.

२०१३ साली नाशिकची प्रमिला कुंभारकर ही तरुणी नऊ महिन्यांची गरोदर असताना तिचा तिच्या वडिलांनीच गळा आवळून खून केला. महाराष्ट्र अंनिसने या प्रकरणाचा मागोवा घेतला असता या खुनामागचं कारण पुढे आलं. ते म्हणजे 'जातपंचायत'. प्रमिलाने मातंग समाजाच्या मुलाशी आंतरजातीय विवाह केला होता. ती गरोदर राहिली. तिच्या पोटात दुसर्‍या जातीचा अंश वाढतो आहे, असे सांगत जातपंचांनी प्रमिलाच्या वडिलांवर दबाव आणला आणि अखेरीस जातपंचांच्या दबावापोटी, दहशतीपोटी त्यांनी प्रमिलाचा जीव घेतला. नंतर त्या घटनेचा निषेध-मागोवा-न्यायालयीन लढाई हे चक्र सुरू झालं. डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी जातपंचायतींवर लेख लिहिला. त्यानंतर महाराष्ट्रभरातील जातपंचांकडून होणार्‍या शोषणविषयक प्रकरणांचा ओघ महाराष्ट्र अंनिसकडे सुरू झाला. कोणाला आंतरजातीय विवाह केला म्हणून, कोणाला प्रेमविवाह केला म्हणून, तर कोणाला पंचांना दारू-मटण दिलं नाही म्हणून बहिष्कृत करण्यात आलं होतं. वेगवेगळ्या कारणांनी बहिष्कृत केलेल्यांची अनेक प्रकरणं समोर आली. त्या प्रकरणांमध्ये दिल्या जाणार्‍या शिक्षाही अतिशय क्रूर होत्या. एका प्रकरणात त्या स्त्रीला पुन्हा जातीत घेण्यासाठी जातपंचांनी तिच्याकडे शरीरसुखाची मागणी केली होती. कोणाकडे जबर दंड, तर कोणाची अग्निपरीक्षा अशा प्रकारे जातपंचांची मनमानी सुरू असल्याचं समोर आलं.

'जातपंचायत' ही एक सामाजिक संस्था असून ती त्या त्या जातसमाजातील विविध प्रथांचं नियमन करते. सदस्यांच्या सामाजिक किंवा वैयक्तिक वर्तनावर नियंत्रण ठेवते. मौखिक किंवा तोंडी फतवे काढून सदस्यांमधील किंवा कुटुंबातील वाद सामूहिकपणे सोडवते किंवा निर्णय देते. तिला 'गावकी', 'भावकी', 'कांगारू कोर्ट', 'सालारू कोर्ट' व 'खाप पंचायत' अशा वेगवेगळ्या नावांनी ओळखलं जातं. प्राचीन काळात दळणवळणांच्या साधनांचा अभाव, जातवार विभागलेले समूह यातून जातींचं व्यवस्थापन करण्यासाठी जातपंचायतींचा उगम झाला. एकेकाळी न्याय करण्यासाठी अस्तित्वात आलेल्या जातपंचायतींनी पुढच्या काळात हुकूमशाही वृत्ती आणि क्रूरपणाचं धोरण अवलंबलं. बहिष्काराचं शस्त्र वापरलं.

अगदी जन्मापासून ते मरणापर्यंत, बारशापासून ते सरणापर्यंत सर्वच बाबी पंचांच्या हातात. कुणी कोणते कपडे घालावेत, कधी लग्न करावं अन कोणाशी करावं या सर्वच बाबींवर जातपंचांचा अधिकार असतो. एखाद्याच्या प्रेतयात्रेत सामील न होण्याचा निरोप जातपंचांनी दिल्यास तिरडी तशीच ठेवून लोक निघून गेले, घरात वडिलांचे प्रेत असताना कुणीही समाजबांधव फिरकले नाहीत, अशा अनेक तक्रारी येत होत्या. त्यापेक्षाही भयंकर म्हणजे मुलीने प्रेमविवाह केला किंवा मुलीने आंतरजातीय विवाह केला म्हणून जातपंचांच्या दबावामुळे जिवंत मुलीचे अंतिम विधी सुद्धा अनेक कुटुंबांनी केले होते. नाशिकच्या प्रमिला कुंभारकरच्या प्रकरणानंतर म्हणजे २०१३ मध्ये डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र अंनिसने 'जातपंचायतीस मूठमाती अभियान' सुरू केलं. हे अभियान सुरू झालं त्यावेळी सुरुवातीला आम्हा कार्यकर्त्यांमध्ये असाच समज होता की, जातपंचायती फक्त भटक्या समाजातच आहेत. परंतु रायगड जिल्ह्यातलं बौद्ध धमार्तील प्रकरण, महाबळेश्वरमधील मुस्लीम बांधवांचं प्रकरण, अकोले येथील मारवाडी कुटुंबाचं प्रकरण, तर पुण्यातील श्रीगौंड ब्राह्मण असलेल्या, राजकीय क्षेत्रात नेतृत्व करणार्‍या बांधवांचं बहिष्कृततेचं प्रकरण, अशी अनेक विविध जातधमार्तील प्रकरणं येत गेली आणि संभ्रम दूर झाला. फरक एवढाच होता की, आदिवासी-भटका समाज असेल, तर दिल्या जाणार्‍या शिक्षा या मोठ्या प्रमाणात शारीरिक व आर्थिक छळाच्या असतात, तर अन्य समाजात त्या बहुतांशी मानसिक छळाशी निगडित असतात. उदाहरणार्थ, एका भटक्या समाजातील जातपंचायतीने बहिष्कृत परिवाराला कुर्‍हाड, कोयता, तलवार यांचा वापर करत जीवघेणी मारहाण केली. मध्यस्थी करण्यास गेलेल्या इतर समाजाच्या गावकर्‍यांनाही पंचांनी मारहाण केली. इथे बहिष्कृत करण्याचं कारण होतं की, रामा शिंदेने पंचांच्या विरोधाला न जुमानता मुलाचं लग्न लावलं. म्हणून रामाच्या मुलीचं ठरलेलं लग्न जातपंचांनी साखरपुड्याच्या दिवशी मोडलं. त्या मुलीशी लग्न करण्यास समाजातील कोणीही तयार होत नव्हतं. रामाला पुन्हा जातीत घेण्यासाठी गावातील तंटामुक्तीच्या लोकांनी मध्यस्थी केली. या गोष्टीचा राग येऊन जातपंचांनी रामाच्या घरावर हल्ला केला. रक्तबंबाळ होईपर्यंत मारहाण केली. घरातील स्त्रियांना नग्न करून मारहाण केली. गावकर्‍यांनी पीडितांना दवाखान्यात भरती केलं. परंतु पोलिसांना कळवूनही पोलीस तिकडे फिरकलेही नाहीत. कारण जातपंच एका राजकीय पक्षाशी संबंधित होते. आणि गावचे सरपंच जातपंचांच्या सोबत होते. दुसरं उदाहरण आहे ते कोकणातील भावकीचं. आशा तळेकर नावाच्या कोकणातील विधवा स्त्रीला जातीतून बहिष्कृत करण्यात आलं. बहिष्कृततेचे चटके सहन न झाल्याने आशाने आत्महत्या केली.

शिक्षांचे स्वरूप

जातपंच म्हणजे देवाचा अवतार समजला जातो. पंचांचा शब्द अंतिम मानला जातो. पंच नियम बनवतात, न्यायनिवाडे करतात आणि शिक्षाही करतात. जातपंचायती मुख्यतः यात्रा-जत्रांच्या वेळी देवस्थानाच्या ठिकाणी भरवल्या जातात. अन्य ठिकाणी भरल्यास एखाद्या दगडाला देव मानून पूजा केली जाते. त्यामुळे पंच बोलतात तो देवाच्या तोंडचा शब्द मानला जातो. पंचांच्या निर्णयाविरोधात ब्र काढला जात नाही. जातीवरची आपली सत्ता टिकवून ठेवण्यासाठी पंचायतीने चित्र-विचित्र कायदे केले आहेत. बहिष्कृत केल्यावर शिक्षा म्हणून अंगावरच्या कपड्यात जिवंत सरडा सोडणं, कपाळावर डाग देणं, अर्धी मिशी काढणं, बायको गहाण ठेवायला सांगणं, स्त्रीची विक्री करणं, डोकं भादरून गाढवावरून धिंड काढणं, चटके देणं, अशा प्रथा होत्या. आजही काही जमातींमध्ये त्या दिल्या जातात.

जातपंचायती आणि राजकीय नेते

जातपंचांची त्यांच्या त्यांच्या जातीवर हुकमत चालते. त्यामुळे एकगठ्ठा मतं मिळण्यासाठी जातपंच हाताशी असणं ही राजकीय क्षेत्राची गरज आहे. म्हणूनच जातपंचायतींच्या प्रकरणात पीडितांना न्याय मिळवून देताना आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना राजकीय हस्तक्षेपालाही सामोरं जावं लागलं. निवडणुकीचे वारे वाहू लागले की, राजकीय पुढार्‍यांकडून येणार्‍या पैशावर डोळा ठेवून जातपंच सक्रीय होतात.

मूठमाती अभियानाची सुरुवात

महाराष्ट्र अंनिसने डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या नेतृत्वाखाली ऑगस्ट २०१३ मध्येच जातपंचायतींना मूठमाती देण्यासाठी लढा सुरु केला. प्रमिला कुंभारकरचा बळी गेलेल्या नाशिकमध्येच ८ ऑगस्ट २०१३ रोजी "जातपंचायत मूठमाती अभियाना"ला सुरुवात झाली. आपल्या भाषणात डॉ. दाभोलकर म्हणाले की, 'जात हीच एक मोठी अंधश्रद्धा आहे, जातपंचायत हे तिचं अग्रदल आहे. जातीचं अग्रदल असलेली जातपंचायत नष्ट करू शकलो तरी जातीला हादरे बसतील.'

मूठमाती म्हणजे अंतिम विधी. शेवट करणे. त्यानंतर दुसरी परिषद १५ ऑगस्ट २०१३ मध्ये डॉक्टर दाभोलकरांच्या पुढाकारानेच लातूरमध्ये झाली. याच दरम्यान म्हणजे २० ऑगस्ट २०१३ला डॉ.दाभोलकरांचा खून झाला.

सामाजिक बहिष्कारविरोधी कायदा

यानंतर नाशिक, लातूर, पुणे, जळगाव, महाड अशा विविध ठिकाणी अंधश्रद्धा निर्मूलन समितीने 'जातपंचायत मूठमाती अभियाना'अंतर्गत परिषदा घेतल्या. डॉ. दाभोलकरांच्या हत्येनेही काम थांबलं नाही. परंतु जातपंचाच्या या मनमानीला आळा घालण्यासाठी स्वतंत्र कायदा अस्तित्वात नव्हता. महाराष्ट्र अंनिसने निवेदनं, आंदोलनं, शासनाला प्रस्तावित कायद्याचा ड्राफ्ट देणं, अशा विविध मार्गांनी प्रयत्न केले. त्या प्रयत्नांना १३ एप्रिल २०१६ मध्ये यश आलं. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या १२५ व्या जयंतीच्या पूर्वसंध्येला 'सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा' अस्तित्वात आला. बाबासाहेबांनी स्वतः वाळीत टाकण्याच्या प्रथे विरुद्ध संघर्ष केला होता. हा कायदा अस्तित्वात येणं म्हणजे त्यांना कृतीशील अभिवादनच.

सोळा जातपंचायती बरखास्त

दरम्यानच्या काळात महाराष्ट्र अंनिसच्या प्रयत्नातून १६ जातपंचायती बरखास्त झाल्या. अनेक ठिकाणी जातपंचायतींच्या ऐवजी समाज विकास मंडळं स्थापन झाली. कोरोनाच्या काळात सर्वत्र काम थंडावल्यामुळे जातपंचायती पुन्हा सक्रीय होऊ पहात होत्या. मात्र त्या-त्या समाजाचं झालेलं प्रबोधन, त्यातून समाजाची बदललेली मानसिकता, कायदा, कार्यकर्त्यांची सतर्कता यामुळे या प्रवृत्तींना आता थोडा तरी चाप बसला आहे.



## सामाजिक न्यायाचा टप्पा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून तेलंगणमधील काँग्रेस सरकारने सामाजिक न्यायाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. अनुसूचित जातींच्या वर्गीकरणाची अंमलबजावणी करणारे तेलंगण देशातील पहिले राज्य ठरले. शिक्षण आणि सरकारी नोकर्‍यांमध्ये यापुढे नव्या वर्गीकरणानुसार अंमलबजावणी होईल. गेल्या वर्षी १ ऑगस्टला सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक निकाल दिला; अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांचे उपवर्गीकरण करून या समुदायांमधील सर्वात दुर्लक्षित गटांना स्वतंत्र कोटा देण्याचा तो महत्त्वाचा निर्णय होता. आरक्षण देताना सर्व जातींना वर्षानुवर्षे एकाच पारड्यात तोलले गेले. यामुळे काही विशिष्ट जातींना याचा मोठा फायदा झाला आणि काही जाती मात्र आरक्षण असूनही अधिकाधिक वंचित राहत गेल्या. हा अनुशेष लोकसंख्येसोबत वाढत गेला. सरकारी नोकर्‍यांमध्ये तर काही विशिष्ट जातींची मक्तेदारी निर्माण झाल्याचे स्पष्ट दिसत होते. ऐतिहासिक आणि अनुभवजन्य पुराव्यांनुसार अनुसूचित जातींचा गट एकसंध नाही, हे महत्त्वाचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले होते. हा निकाल आल्यानंतर तातडीने हालचाली करून या वर्गीकरणासाठी तेलंगण सरकारने उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती शमीम अख्तर यांच्या अध्यक्षतेखाली आयोग स्थापन केला होता. फेब्रुवारी महिन्यात आयोगाच्या शिफारशी सरकारने स्वीकारल्या. अनुसूचित जातींचे तीन गटांमध्ये वर्गीकरण करताना सर्वोच्च न्यायालयाच्या निकालासह, अनुभवजन्य माहिती, अनुसूचित जाती समुदायांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, रोजगार आणि राजकीय स्थिती विचारात घेतली. तेलंगणमध्ये ५९ अनुसूचित जाती आहेत. त्यापैकी ३३ उपजाती पूर्वी ज्या गटात होत्या, त्याच गटात राहतील, केवळ २६ उपजातींचे फेरबदल झाले आहे, मात्र आधीच अधिसूचित केलेल्या रिक्त पदांवर हे वर्गीकरण लागू होणार नाही. १५ टक्के आरक्षणाचे तीन गटांत वर्गीकरण करण्यात आले आहे. तेलंगणमधील या प्रयोगाला अर्थातच राजकीय पार्श्वभूमी आहे. तेलंगणमध्ये ७० टक्के मतदार ओबीसी आणि एससी आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी या मतांची बेगमी करण्याचा हा मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सरकारचा प्रयत्न आहे, हे उघड आहे. तेलंगणाने अलीकडेच ओबीसी कोटा ४२ टक्के करण्याचा निर्णय घेतला आहे. पक्षाचे नेते राहुल गांधीही आरक्षणावरील ५० टक्के मर्यादा हटवण्याबद्दल बोलत आहेत. तेलंगण ही काँग्रेससाठी एक प्रयोगशाळा आहे. सामाजिक न्यायाची भाषा बोलताना तेलंगणसारखी उदाहरणे पुढील प्रवासात त्यांच्यासाठी आश्वासक थांबे ठरणार आहेत.

## ठाकरे बंधुंनंतर आता पवार काका-पुतण्याचं मनोमिलन?

# १५ दिवसात ३ भेटीत काय झाली चर्चा?



**उल्हासनगर :** मागील १५ दिवसात अजित पवार, शरद पवारांची तिसऱ्यांदा भेट झालीय. दरम्यान आज अजित पवार आणि शरद पवार यांच्यात तब्बल अर्धा तास चर्चा झाली. त्यामुळे पवार कुटुंब एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आलंय.

ठाकरे कुटुंबानंतर आता पवार कुटुंब देखील एकत्र येणार असल्याच्या चर्चा सुरु झाल्या आहेत. कारण मागील १५ दिवसात शरद पवार आणि अजित पवार तिसऱ्यांदा एकत्र आले आहेत. एआय तंत्रज्ञानाचा शेतीमध्ये कसा उपयोग करायचा? यासंदर्भातल्या बैठकीत दोन्ही नेते उपस्थित होते.. दरम्यान या बैठकीनंतर अजित पवार आणि शरद पवार याच्यात तब्बल अर्धा तास चर्चा झाली.

अजित पवार, शरद पवार एकत्र आल्यानंतर पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात कुजबूज सुरु झालीय.. शरद पवार आणि अजित पवारांच्या भेटीवरुन राऊतांना टोला लगावलाय. तर सामाजिक संस्थासंदर्भातले प्रश्न सोडवण्यासाठी अजित पवार, शरद पवार एकत्र येतात त्यात वावगं नसल्याचं भुजबळांनी म्हटलंय. शरद पवार, अजित पवारांनी एकत्र यावं अशी भावना रोहित पाटील यांनी देखील व्यक्त केलीय. दोन्ही नेते एकत्र आल्यास पक्षसंघटना मजबूत होईल असा दावा त्यांनी केलाय.. तर भेटीगाठी एकत्र येण्यासाठी नसतात असं विधान विजय वडेट्टीवारांकडून करण्यात आलंय.

अजित पवार आणि शरद पवार तिसऱ्यांदा एकत्र आले आहेत. १० एप्रिलला जय पवारच्या साखरपुड्यात संपूर्ण कुटुंब एकत्र आलं होतं. १३ एप्रिलला साताऱ्यात रयत संस्थेच्या बैठकीत अजित पवार आणि शरद पवार एकत्र आले होते. आणि त्यानंतर आज एआय तंत्रज्ञानाचा शेतीत कसा उपयोग करायचा? यासंदर्भात आयोजित केलेल्या बैठकीत दोन्ही पवार एकत्र आलेत.

विधानसभा, लोकसभा निवडणुकीत अजित पवारांनी शरद पवारांवर टीकास्त्र डागलं होतं.. मात्र, मागील काही दिवसांपासून अजित पवारांचे शरद पवारांबाबतचे सकारात्मक वक्तव्य. त्यामुळे पवार कुटुंबात नेमकं काय चाललंय असा प्रश्न उपस्थित होतोय.

अजित पवार आणि शरद पवारांचं वारंवार एकत्र येणं. त्यातल्या त्यात शरद पवारांचे गोडवे गाणं यामागे अजित पवारांचा मोठा उद्देश असल्याचं बोललं जातंय. तसंच दोन्ही नेते लवकरच एकत्र येणार असल्याची देखील चर्चा आहे. त्यामुळे हे दोन्ही एकत्र येणार की फक्त हवाच आहे. ते पाहणं महत्त्वाचं ठरणाय.

# हे कायद्याचे राज्य आहे की बळाचे?

## उच्च न्यायालयाचा 'सिडको'च्या अधिकाऱ्यांना संतप्त सवाल

**मुंबई :** गृहनिर्माण प्रकल्प, घरांच्या योजनांमुळे चर्चेत असलेल्या शहर आणि औद्योगिक विकास महामंडळाला म्हणजेच सिडकोला मुंबई उच्च न्यायालयाने एका वेगळ्याच कारणामुळे फटकारल्याचं पाहायला मिळत आहे. मुंबई उच्च न्यायालयाने नुकत्याच एका सुनावणीदरम्यान, सीडकोच्या कारवाईसंदर्भातील नाकर्तेपणावरुन ताशेरे ओढताना हे राज्य कायद्याचे आहे की बळाचे उद्विग्न सवाल उपस्थित केला आहे.

**न्यायालयाने व्यक्त केला संताप**

झालं असं की, नवी मुंबईतील एका भूखंडावरील बेकायदेशीर बांधकामे हटविण्यात 'सिडको' अपयशी ठरत असल्याचं निरिक्षण मुंबई उच्च न्यायालयाने नोंदवलं. अतिक्रम हटवण्याच्या कारवाईसाठी गेलेल्या 'सिडको'च्या अधिकाऱ्यांना सरपंचाने धमकावल्याने कारवाई करता आली नाही. या गोष्टीची दखल घेत न्यायालयाने संतापून, 'हे कायद्याचे राज्य आहे की बळाचे,' असा सवाल केला.

**कारवाई करण्याचे दिले आदेश**


दीपक पाटील यांनी केलेल्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान, सदर भूखंडावरील बेकायदेशीर बांधकामे एका आठवड्याच्या आत हटविण्यासाठी आवश्यक कायदेशीर उपाय करा, असे आदेश न्यायालयाने सिडकोला दिले आहेत. त्यामुळे आता सिडकोचे अधिकारी नेमकी कशापद्धतीने कारवाई करतात हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

**अनेकदा टाकला जातो दबाव**

सामन्यपणे बेकायदेशीर बांधकामांविरोधातील कारवाईदरम्यान स्थानिकांनी अधिकाऱ्यांवर हल्ला करु नये, कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती बिघडू नये या हेतूने मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला जातो. मात्र अनेकदा स्थानिकांचं नेतृत्व करणारे स्थानिक नेते, लोकनियुक्त प्रतिनिधी आणि इतर घटकांचा दबाव टाकून कारवाई रोखण्याचा प्रयत्न केला जातो. असाच काहीसा प्रकार नवी मुंबईतील बोकडविरा गावात कारवाईसाठी करण्यासाठी गेलेल्या सिडकोच्या अधिकाऱ्यांसोबत घडला.

**नेमकं हे प्रकरण आहे तरी काय?**

सध्या न्यायप्रविष्ठ असलेल्या या प्रकरणामध्ये, दीपक पाटील यांनी 2016 मध्ये याचिका करून आपल्या जमिनीवरील अनधिकृत बांधकामे पाडण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी न्यायालयामध्य केली होती. सदर याचिकेवर न्यायालयामध्ये झालेल्या सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठाने 'सिडको'चे अधिकारी कठोर कारवाई करण्यास इच्छुक नाहीत, असे ताशेरे ओढले. न्यायालयाने ताशेरे ओढल्यानंतर सिडकोने आपली बाजू मांडली. कायदेशीर कारवाईदरम्यान अधिकाऱ्यांना बोकडविरा गावच्या सरपंचाने धमकावल्याचे सिडकोच्या वतीने सांगण्यात आले. सिडकोने दिलेले हे कारण ऐकून न्यायालय अधिकच संतापले. न्यायालयाने, बेकायदेशीर अतिक्रमण हटवण्याच्या मोहिमेदरम्यान अधिकाऱ्यांना पुरेसे पोलीस संरक्षण मिळण्याचा अधिकार आहे आणि बेकायदेशीर कृत्यांना रोखणे व कायद्याचे राज्य स्थापित करणे हे अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे, असे बजावले. न्यायालयाने अधिकाऱ्यांना त्यांच्या कर्तव्याची आणि अधिकारांची जाणीव करुन दिली.



## ठाणे पालिका क्षेत्रात पावसाळापूर्व नालेसफाई सुरू



सोमवारी सकाळी कापूरबावडी पोलीस स्टेशनलगत असलेल्या नाल्याच्या सफाईने या मोहिमेचा आयुक्त सौरभ राव यांच्या उपस्थितीत आरंभ करण्यात आला. त्यावेळी, माजी ज्येष्ठ नगरसेवक संजय भोईर, माजी नगरसेविका निशा पाटील, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त मनीष जोशी, दिनेश तायडे, उपनगर अभियंता सुधीर गायकवाड, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, सहाय्यक आयुक्त स्मिता सुर्वे, कार्यकारी अभियंता संजय कदम आदी उपस्थित होते.

**ठाणे :** ठाणे महापालिका क्षेत्रातील नालेसफाईच्या कामास सोमवारपासून सुरूवात झाली आहे. ही कामे पावसाळ्यापूर्वी, मे महिन्याच्या अखेरपर्यंत पूर्ण होतील, असे प्रतिपादन ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे. पहिल्या टप्प्यात पाच प्रभाग समिती क्षेत्रात नालेसफाईचे कार्यादेश देण्यात आले आहेत. दुसऱ्या टप्प्यातील काम २५ एप्रिलपासून काम सुरू होणार आहे. नालेसफाईचे वेळापत्रक काटेकोरपणे पाळले जावे. झालेल्या कामाची माहिती दररोज नोंदविण्यात यावी. तसेच, संबंधित अभियंता आणि स्वच्छता निरीक्षक यांनी त्याचा दैनंदिन अहवाल ठेवावा, असे निर्देश आयुक्त राव यांनी दिले आहेत. नाल्यातून उचललेला गाळ तत्काळ उचलला जावा. त्यामुळे दुर्गंधी पसरू नये, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले. त्यानंतर, हरदास नगर येथील नालेसफाईच्या कामास आरंभ करण्यात आला. पाठोपाठ, रेल्वे मार्गालगत, ज्ञानसाधना महाविद्यालयाजवळ नाल्याच्या सफाईचे काम सुरू करण्यात आले. त्यावेळी, माजी नगरसेवक विकास रेपाळे, माजी नगरसेविका नम्रता फाटक आणि नम्रता भोसले, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त मनीष जोशी, शंकर पाटोळे, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, सहाय्यक आयुक्त भालचंद्र घुगे आणि सोपान भाईक, कार्यकारी अभियंता मोहन कलाल आणि ऋषिकेश जवळकर आदी उपस्थित होते. ठाणे महापालिका क्षेत्रातील नऊ प्रभाग समिती क्षेत्रात छोटे आणि मोठे असे सुमारे २७८ किलोमीटर लांबीचे नाले आहेत. पहिल्या टप्प्यात नौपाडा-कोपरी, उथळसर, माजिवडा-मानपाडा, दिवा आणि कळवा या पाच प्रभाग समिती क्षेत्रात नालेसफाईचे कार्यादेश देण्यात आले आहेत.

# मुंबईतील घर घेणे आता परवडणार

## म्हाडा लवकरच सर्वसामान्यांसाठी घेणार मोठा निर्णय

**मुंबई :** मुंबईत घरांच्या किंमती आता सर्वसामान्यांच्या अवाक्याबाहेर गेल्या आहेत. गेल्या काही वर्षांपासून सर्वसामान्य म्हाडाच्या घरांवर अवलंबून आहेत. मात्र म्हाडच्या घराच्या किंमतीही चांगल्याच वाढल्या आहेत. त्यामुळं सर्वसामान्यांना म्हाडाची घरे खरेदी करण्यासाठीही विचार करावा लागत आहो. मात्र लवकरच सर्वसामान्यांना परवडणाऱ्या किंमतीत म्हाडाची घरे उपलब्ध होणार आहेत. म्हाडाच्या घरांच्या किमती निश्चित करण्याबाबतच्या सूत्राची पुनर्रचना करण्यासाठी प्राधिकरणाने त्रिसदस्यीय समिती नेमली आहे. म्हाडाने नेमलेली समिती सर्वसामान्यांना स्वस्तात घर मिळेल आणि म्हाडाचेदेखील नुकसान होणार नाही याद्दष्टीने अभ्यास करणार आहे. पुढील तीन महिन्यांत ही समिती आपला अहवाल उपाध्यक्षांकडे सादर करणार असून त्यानंतर तो मंजुरीसाठी शासनाकडे पाठवला जाणार आहे.

**म्हाडाच्या घराच्या किंमती कशा ठरतात?**

सध्या जमिनीचा खर्च, बांधकाम खर्च आणि आस्थापन खर्च आदींचा विचार करून म्हाडाच्या घराच्या किमती निश्चित केल्या जातात. अत्यल्प आणि अल्प गटातून म्हाडा शून्य टक्के नफा घेते. मध्यम उत्पन्न गटातून दहा टक्के तर उच्च उत्पन्न गटातून १५ टक्क्यांपर्यंत नफा घेऊ शकते. म्हाडाने एखादा भूखंड दहा-बारा वर्षांपूर्वी घेतला असेल तर त्या भूखंडाच्या सुरक्षेसाठी मोठा खर्च केला असेल तर त्या खर्चाचदेखील घराच्या किमतीत समावेश केला जातो. त्यामुळे साहजिकच घरांच्या किमती वाढतात. एखाद्या भूखंडावर उशिरा इमारत बांधली गेली असेल तर त्याचा भुर्दंड सर्वसामान्यांनी का सहन करायचा? प्राधिकरणाचे नुकसान न होता सर्वसामान्यांना स्वस्तात घर मिळाले पाहिजे याद्दष्टीने घरांच्या किमती ठरवताना कोणत्या गोष्टी अंतर्भूत करायच्या आणि कोणत्या नाही याचा समिती अभ्यास करणार आहे, अशी माहिती म्हाडाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.





**क्षेत्रफळाऐवजी किमतीनुसार उत्पन्न गट ठरणार**

म्हाडाच्या धोरणानुसार ३०० चौरस फुटापर्यंतची घरे अत्यल्प उत्पन्न गटासाठी, ४५० चौरस फुटापर्यंतची घरे अल्प उत्पन्न गटासाठी, ६०० चौरस फुटापर्यंतची घरे मध्यम उत्पन्न गटासाठी तर ९०० चौरस फुटापर्यंतची घरे उच्च उत्पन्न गटासाठी देण्यात येतात. उपनगरातील ३०० चौरस फुटाच्या घराची किंमत आणि तेवढ्याच क्षेत्रफळाच्या दक्षिण मुंबईतील घराची किंमत यात जमीन-अस्मानाचा फरक असतो. त्यामुळे घराच्या क्षेत्रफळाऐवजी त्याच्या किमतीनुसार उत्पन्न गट ठरवता येतील का, याचाही अभ्यास केला जाणार असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

# रेल्वेच नव्हे आता मुंबई विमानतळावरही ब्लॉक

## ६ तास उड्डाणं राहणार बंद... तारीख कोणती, वेळ काय?



**मुंबई :** मुंबईकरांची लाईफलाईन असलेल्या मध्य रेल्वे तसेच हार्बर आणि वेस्टर्न रेल्वे लाइनवरही दुरूस्तीच्या, देखाभालीच्या कामासाठी वेळोवेळी ब्लॉक घेण्यात येतो. कालच (रिवारी) मध्य रेल्वेच्या मार्गावर ५ तासांचा विशेष ब्लॉक घेण्यात आला होता. आता रेल्वे प्रवाशांप्रमाणेच विमानाने प्रवास करणाऱ्यांसाठीही एक महत्वाची बातमी समोर आली आहे. रेल्वे मार्गाप्रमाणेच आता विमानतळावरही 'ब्लॉक' घेण्यात येणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ हा येत्या ९ मे रोजी काही तास बंद ठेवण्यात येणार आहे. धावपट्टीची दुरूस्ती तसेच देखभालीच्या कामासाठी ९ मे रोजी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ हे तब्बल ६ तास बंद ठेवले जाणार आहे. मान्सूनपूर्व कामांसाठी, धावपट्टीच्या देखभालीसाठी विमावनतळावर हा ब्लॉक घेण्यात येणार असल्याचे समजते. सहा तासांसाठी विमानतळ बंद राहिल्याने प्रवाशांची मात्र मोठी गैरसोय होण्याची शक्यता आहे. दरवर्षीच हे काम हाती घेतले जाते. त्यामुळे यंदाही ब्लॉक घेऊन धावपट्टीची दुरूस्ती तसेच देखभालही केली जाणार आहे. यंदा ९ मे रोजी(शुक्रवार) मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हा ६ तासांसाठी बंद ठेवण्यात येणाप आहे. सकाळी ११ ते संध्याकाळी ५ या वेळेत ०९/२७ व १४/३२ या दोन्ही धावपट्ट्यांवर देखभालीची कामे केली जाणार आहेत. दरम्यान या ब्लॉकची तसेच देखभालीचे काम करण्यात येणार असल्याची सूचना ६ महिने आधीच विमान चालकांना देण्यात आली आहे. जेणेकरून विमानांचे वेळापत्रक व नियोजन योग्य प्रकारे होऊ शकेल, असे विमानतळ प्राधिकरणाने स्पष्ट केले. उड्डाणांचे वेळापत्रक बदलण्यासाठी आणि पयार्यी व्यवस्था करण्यासाठी विमान कंपन्यांना पुरेसा वेळ देण्यात आला आहे. तसेच प्रवाशांनाही या नियोजित ब्लॉकची माहिती देण्यात आली आहे. विमानतळ प्राधिकरणाच्या संचालकांनी यासंदर्भात अधिकृत घोषणा केल्याची माहिती देखील समोर आली आहे.

# लाडक्या बहिणींसाठी खुशखबर!

## 'या' दिवशी खात्यात जमा होणार एप्रिल महिन्याचे १५०० रुपये



**भुसावळ। प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाकडून महिलांसाठी लाडकी बहीण योजना राबवली जात आहे. दर महिन्याला या योजनेतील पात्र महिलांच्या खात्यात राज्य सरकारकडून १५०० रुपये दिले जातात. मात्र एप्रिल महिना संपत आला तरी अद्याप लाडक्या बहिणींच्या खात्यात १५०० रुपये जमा झालेले नाहीत. त्यामुळे अनेक लाडक्या बहिणी सध्या १५०० रुपये खात्यात कधी जमा होतील याच्या प्रतीक्षेत आहेत. अशा बहिणींसाठी एक मोठी बातमी समोर येत असून मंत्री आदिती तटकरे यांनी एप्रिल महिन्याच्या अखेरपर्यंत लाडकी बहीण योजनेचे पैसे पात्र महिलांच्या खात्यात जमा होतील असं म्हटलं आहे. एप्रिल महिना संपण्यासाठी आता अवघे आठ दिवस शिल्लक असून ३० एप्रिल पर्यंत महिलांच्या खात्यात लाडकी बहीण योजनेचे १५०० रुपये जमा होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. सध्या लाडक्या बहिणीच्या अर्जांची तपासणी सुरु असून, योजनेच्या निकषांनुसार अपात्र ठरणाऱ्या महिलांना या योजनेतून वगळण्यात येणार आहे. योजनेच्या निकषांनुसार ज्या महिलांचं उत्पन्न हे २.५० लाखांपेक्षा जास्त असेल अशा महिलांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. आतापर्यंत लाडकी बहीण योजनेतून ९ लाख अपात्र महिलांची नावे वगळण्यात आली आहेत. लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांच्या अर्जाची पडताळणी विधानसभा निवडणूक संपल्यावर सुरु करण्यात आली. यात ज्या महिला या महाराष्ट्राच्या रहिवासी नाहीत तसेच ज्या सरकारी नोकरी करत आहेत अशांची पडताळणी करून त्यांना योजनेतून वगळण्यात आलं आहे.

# व्यावसायिकाच्या घरावर गोळीबार

**अंबरनाथ :** अंबरनाथ पूवेर्तील हुतात्मा चौकाजवळील प्रसिद्ध बांधकाम व्यवसायिक विश्वनाथ पनवेल यांच्या सीताई सदन इमारती समोर सोमवारी दुपारी अडीचच्या सुमारास दुचाकीवरून आलेल्या दोघांनी गोळीबार केल्याने अंबरनाथ मध्ये कमालीची दहशत पसरली आहे. पोलीस गोळीबार करणाया दोघा गुन्हेगारांचा पोलीस शोध घेत आहेत. अंबरनाथ शहरातील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक विश्वनाथ पनवेकर यांचे हुतात्मा चौकाजवळ निवासस्थान आणि कार्यालय आहे. हा शहरातील सर्वाधिक वर्दळीचा भाग आहे. याच ठिकाणी खासदार श्रीकांत शिंदे यांचे देखील जनसंपर्क कार्यालय आहे. तसेच मंगल कार्यालयासमवेत अनेक मोठ्या कंपन्यांची शोरूम आहेत. सोमवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास हुतात्मा चौकातून एका दुचाकीवर दोघेजण सिताई सदन या इमारती समोर आले. त्यानंतर दुचाकीवर मागे बसलेल्या एकाने दोन गोळ्या झाडल्या. त्यानंतर दोघांनी पळ काढला. सिताई सदन हे अंबरनाथमधील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक पनवेल यांचे निवासस्थान असल्याने या ठिकाणी झालेल्या गोळीबारानंतर शहरात एकच खळबळ उडाली आहे. हा सर्व प्रकार सीसीटीव्ही कॅमेयात कैद झाला असून पोलिसांना आरोपींची ओळख पटली असल्याची माहिती आहे. यातून काही अट्टल गुन्हेगारांचे नाव पुढे आले आहे. घटनेची माहिती मिळताच अंबरनाथ पूर्व पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी, परिमंडळ चारचे पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांच्यासह उल्हासनगर क्राईम ब्रांचचे पोलीस अधिकारी अशोक कोळी तत्काळ घटनास्थळी दाखल झाले.

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे ४०११०१.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र. मनपा/उद्यान/मिरारोड/६०/२०२५-२६** **दिनांक : २५/०४/२०२५**

**// जाहिर नोटीस //**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने / मैदाने मधील जागांवर पेंटींग /स्लोगन पेंटिंग व डिजीटल वॉल पेंटींग / थ्रीडी पेंटिंग करणेकामी चालु जिल्हा दरसुचीमध्ये दर उपलब्ध नसल्यामुळे चालू बाजारभावातील दरपत्रक मागविण्यात येत आहे.

सदर कामाची दरसुची महानगरपालिकेच्या संकेत स्थळावरून Download करुन दि. ०१/०५/२०२५ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिका, उद्यान विभाग, २ रा मजला, दि. प्रभाग समिती क्र. ०४, कै. विलासराव देशमुख भवन, जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व) येथे स्वारस्य असलेल्या कंत्राटदाराने सोबत जोडलेल्या दरपत्रकातील बाबींकरीता दर भरून बंद लिफाफ्यामध्ये देण्यात यावेत.

**जा.क्र.मनपा / मावज/ई -५१५१५४९/२०२५-२६**
**दिनांक २५/०४/२०२५**

Signed By
Kalpita Kishor Pimple
Date : 25-04-2025 16:35:00
**उप आयुक्त (उद्यान)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com